11 JUL 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वतःबरोबर विद्यापीठाचेही नाव उज्ज्वल करा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात क्रीडापटू, प्रशिक्षक, व्यवस्थापकांचा गौरव

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : 'राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर यशाचे रंग उधळत चला. स्वतःबरोबरच विद्यापीठ, देशाचे नाव उज्ज्वल करा,' असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागातर्फे आयोजित 'कलर पुरस्कार प्रदान' कार्यक्रमात ते बोलत होते. अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धांत विविध पदके प्राप्त करणाऱ्या ८३ आणि खेलो इंडिया स्पर्धेत पदक मिळविणारे २९ क्रीडापटू आणि त्यांचे प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक यांना कुलगुरू डॉ. शिर्के आणि मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कलर पुरस्कार वितरण समारंभात पुरस्कारप्राप्त क्रीडापटूंसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, शरद बनसोडे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाच्या ११ क्रीडापटूंनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त केले, ही गौरवास्पद बाब आहे. विद्यापीठाने नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. क्रीडा वसतिगृह उभारणीचे काम सुरू आहे. नजीकच्या काळात राज्याचे विद्यापीठीय क्रीडा धोरण तयार करण्याची जबाबदारीही कुलपतींनी विद्यापीठाकडे सोपविली आहे, तीसुद्धा आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'विद्यापीठाने नेहमीच आपल्या परिक्षेत्रात क्रीडाविषयक परिसंस्था विकसित व्हावी, यासाठी प्रयत्न केले. त्याचे फलित म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकदार कामगिरी करणारे क्रीडापटू तयार झाले आहेत.' कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केवळ राष्ट्रीय स्पर्धांतील यशावर समाधानी न राहता पुढे जागतिक स्तरावर जाण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावा.'

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, प्राचार्य डॉ. रमेश कुंभार, डॉ. राजेंद्र रायकर, विकास जाधव उपस्थित होते. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले.

### यांचा झाला गौरव

यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते क्रीडापटू कल्याणी पाटील, श्रुती भोसले, पृथ्वीराज पाटील, साक्षी बनसोडे, दीपाली गुरसाळे, धनंजय जाधव, श्रीधर निगडे, गिरीश जकाते, डॉ. नीलेश पाटील, आय. एच. मुल्ला, आर. टी. पाटील, डॉ. विक्रमसिंह नांगरे, प्रताप जाधव, टी. आर. सावळे, पी. ए. समलेवाले, दीपक पाटील, डॉ. सुनील खराडे, शिवाजी पाभाळे, डॉ. एन. डी. पाटील यांना गौरविण्यात आले. त्यांना विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, रोख पारितोषिक, सन्मानाचे ब्लेझर प्रदान करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
11 JUL 2025
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ३२०० विद्यार्थी बनले कुशल, ५१४ जणांना मिळाली नोकरी

## रोजगार कक्षाचे यश : कार्यालयाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या स्थलांतरित कार्यालयाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या रोजगार कक्षाने गेल्या वर्षभरात विविध ७४ प्रशिक्षण कार्यक्रमांतून ३२०० विद्यार्थ्यांना कुशल केले. परिणामी या कालावधीत ५१४ विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारच्या नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या. विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यालयाचे गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या कक्षाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यालयासमोरील बी-४ बंगल्यामध्ये स्थलांतर करण्यात आले. यानिमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. या कक्षाने वर्षभरात १२८ कंपन्यांनी त्यांचे कॅम्पस ड्राइव्ह विद्यापीठात आयोजित केले. त्यामुळेच बहुतांश विद्यार्थ्यांना रोजगार संधी प्राप्त झाल्या.

जनसंपर्क कक्ष
11 JUL 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यालयाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रसायनशास्त्र अधिविभागाच्या जागेमधून या कक्षाचे कामकाज चालत होते. या कक्षाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यालयासमोरील बी-४ बंगल्यामध्ये स्थलांतर करण्यात आले आहे.

मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी मान्यवरांचे स्वागत करून गेल्या वर्षभरात कक्षाने केलेल्या कामकाजाचा अहवाल सादर केला. नव्या जागेमधून कक्षाने अधिक गतिमानतेने कामकाज करावे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठात सन २००६ पासून मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यान्वित आहे. गेल्या वर्षभरात विविध ७४ प्रशिक्षण कार्यक्रमांतून ३२०० विद्यार्थ्यांना कुशल व प्रशिक्षित केले. परिणामी या कालावधीत ५१४ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. वर्षभरात १२८ कंपन्यांनी त्यांचे कॅम्पस ड्राईव्ह विद्यापीठात आयोजित केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. विजय ककडे, डॉ. आसावरी जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. गणेश पाटील, डॉ. चेतन आवटी, अमर डुम, शामल पवार आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. राजन पडवळ, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. विजय ककडे आदी.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यालयाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. नव्या जागेमधून कक्षाने अधिक गतिमानतेने कामकाज करावे, अशी अपेक्षा कुलगुरूंनी व्यक्त केली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या हस्ते कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. प्रकाश राऊत, डॉ. विजय ककडे, पर्यावरण शास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. अलोक जत्राटकर, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. गणेश पाटील, डॉ. चेतन आवटी, अमर डुम, शामल पवार आदी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठात २००६ पासून मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यान्वित आहे. गेल्या वर्षभरात विविध ७४ प्रशिक्षण कार्यक्रमांतून ३२०० विद्यार्थ्यांना कुशल व प्रशिक्षित केले. परिणामी या कालावधीत ५१४ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाल्या.

सकाळ

# केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्सला पुनर्प्रवेश परीक्षेत सर्वाधिक विद्यार्थी

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १० : विविध २६ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठाने आज तंत्रज्ञान अधिविभागात पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यात एम. एस्सी केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमासाठी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५८२ इतकी सर्वाधिक होती.

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या पहिल्या फेरीत काही जागा रिक्त राहिल्या. त्यामुळे आज दिवसभरात तीन सत्रांमध्ये ओएमआर शीटच्या माध्यमातून पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यासाठी एकूण ११७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १०४४ जणांनी परीक्षा दिली, तर १३२ जण अनुपस्थित राहिले.

परीक्षा दिलेल्यांपैकी ५८२ इतक्या निम्म्या विद्यार्थ्यांची संख्या केमिस्ट्री आणि कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमांची आहे. त्यात केमिस्ट्रीसाठी ३५७ आणि कॉम्प्युटर सायन्ससाठी २२५ विद्यार्थी होते. त्यापाठोपाठ मायक्रोबायोलॉजी (५२), जिओग्राफी (५१), एम.एस. डब्ल्यू (४२), बॉटनी आणि एम.बी.ए. (प्रत्येकी ३३), बायोटेक्नॉलॉजी (२१) आदी अभ्यासक्रमांचा क्रम होता.

दरम्यान, विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील बी.जे. या अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने दोन परीक्षा केंद्रांवर झाली. त्यासाठी ३७ विद्यार्थी उपस्थित होते. बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी आणि एम.बी.ए. (सत्र तीन आणि चार) या अभ्यासक्रमांचे निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे जाहीर करण्यात आले.

सकाळ

# विद्यापीठातील मध्यवर्ती रोजगार कक्षाला मिळाले नवे कार्यालय

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यालयाचे आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी कार्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

रसायनशास्त्र अधिविभागाच्या जागेमधून या कक्षाचे कामकाज चालत असे. या कक्षाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यालयासमोरील बी-फोर बंगल्यामध्ये स्थलांतर केले आहे. या कार्यालयाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी वर्षभरात कक्षाने केलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. नव्या जागेमधून कक्षाने अधिक गतिमानतेने कामकाज करावे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

डॉ. प्रकाश राऊत, विजय ककडे, पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. गजानन राशिनकर, गणेश पाटील, चेतन आवटी, आलोक जत्राटकर, अमर डुम, शामल पवार उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठात २००६ पासून मध्यवर्ती रोजगार कक्ष कार्यान्वित आहे.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह संलग्नित महाविद्यालये तसेच परिक्षेत्रातील युवा वर्गाला रोजगार संधी मिळवून देण्यासाठी कक्ष सातत्याने प्रयत्नशील राहिला आहे. वर्षभरात विविध ७४ प्रशिक्षण कार्यक्रमांतून ३२०० विद्यार्थ्यांना कुशल व प्रशिक्षित केले. परिणामी या कालावधीत ५१४ विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारच्या नोकरीच्या संधी मिळाल्या.

तरुण भारत

# विद्यापीठ पुनर्प्रवेश परीक्षेला हजार विद्यार्थ्यांची उपस्थिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षेला १ हजार १७६ पैकी १ हजार ४४ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेत विविध अधिविभागातील प्रवेश जागा रिक्त राहिल्या होत्या. काही अभ्यासक्रमांना अत्यल्प प्रवेश झाले होते. त्यानुसार विद्यापीठाने गुरूवारी पुनर्प्रवेश घेतली. यामध्ये एम.एस्सी. केमेस्ट्री- सर्व विषय, एम.एस्सी. संख्याशास्त्र, गणित, भूगोल, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र,मायक्रोबायलॉजी, एजीपीएम तर बी.लिब अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एमए ट्रॅव्हल अँट टुरिझम, एमए मास कम्युनिकेशन, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एमबीए, एम.टेक, एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एमए योगशास्त्र, एम.एस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. बायोकेमेस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी व एमए रशियन या विषयांची परीक्षा झाली.